महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे**
भवानी पेठ,पुणे ४११०४२
इमेल-dietpune@maa.ac.in
फोन.न: ०२०-२६४४३२४६

जा.क्र.जि.शि.प्र.सं/शिक्षक स्पर्धा/ ११९३ दि. २९/१०/२०२५

**प्रति,**

१.मा.प्राचार्य ,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२.शिक्षणाधिकारी प्राथमिक ,जि.प.(सर्व)
३..शिक्षणाधिकारी माध्यमिक ,जि.प.(सर्व)
४..गटशिक्षणाधिकारी ,पंचायत समिती (सर्व)
५.प्रशासनाधिकारी ,मनपा.,नपा,(सर्व)

विषय : शिक्षक व अधिकारी यांच्यासाठी परकीय भाषा स्पर्धेचे आयोजन करणे बाबत ....

संदर्भ: १.मा.संचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांच्याकडील जा.क्र.राशैसंवप्रप/ शिक्षक स्पर्धा/२०२५-२६ ,दिनांक १०/१०/२५.चे पत्र
२.मा.संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांचे दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या ऑनलाईन बैठकीतील सूचना .
३.प्रस्तुत कार्यालयाचे पत्र जा.राशैसंवप्रप/साव्यावि.क्र./शिक्षक स्पर्धा/२०२५-२६/१५०१८६३/I/२०२५ दि.१७/१०/२०२५ .

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था ,अनुदानित, अंशतः अनुदानित, प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी ,शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी ,कर्मचारी ,यांच्यामधील परकीय भाषा शिकण्याची व त्यांना नव्या भाषा आत्मसात करण्याची आवड निर्माण व्हावी ,त्याच्यातील स्पर्धात्मक वृत्ती जागृत करून त्यांच्यातील भाषिक कौशल्याला चालना देण्याकरिता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तालुका ,विभाग व राज्यस्तरावर परकीय भाषेच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

**परकीय भाषा स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना :**

- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील नोव्हेंबर महिन्यातील चौथ्या शनिवारी सर्व जिल्ह्यांनी आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात तालुकास्तरीय परकीय भाषा स्पर्धेचे आयोजन करावे.प्रत्येक URC ला तालुका समजावे व त्याप्रमाणे सदर स्पर्धेचे आयोजन करावे.
- शिक्षक व अधिकारी यांना स्पर्धेच्या नावनोंदणी करिता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत लिंक पुरविली गेलेली आहे व लिंकवर भरण्यात आलेल्या माहितीच्या आधारे शिक्षकांचे स्पर्धेकरिता नामनिर्देशन करण्यात यावे.
- सदर लिंक केवळ केंद्रप्रमुख यांनी व शहर साधन केंद्रातून पर्यवेक्षक यांनी केंद्रातून सहभागी होणाऱ्या शिक्षकांकडून भरून घ्यावयाची असून प्रत्येक स्पर्धेकरिता प्रत्येक केंद्रातून जर्मन व फ्रेंच या भाषेकरिता एका शिक्षकाचे नाव स्पर्धेकरिता देण्यात आलेल्या लिंक वर नोंदवावे.
- केंद्रातून शिक्षकांचे नामनिर्देशन करताना केंद्रप्रमुखांनी/पर्यवेक्षकांनी एका भाषेकरिता केवळ एकाच शिक्षकाचे नामनिर्देशन करावे. एकाच शिक्षकाचे एका भाषेपेक्षा अधिक भाषेकरिता नामनिर्देशन करू नये.
- केंद्रप्रमुख/पर्यवेक्षक यांनी स्पर्धेकरिता शिक्षकांचे नामनिर्देशन करताना शिक्षकांची क्षमता व कौशल्य पाहून त्यांना निवडण्याचा प्रयत्न करावा.
- स्पर्धांमध्ये सहभाग घेणारे अधिकारी,कर्मचारी,शिक्षक यांचे स्पर्धेकरिता नामनिर्देशन करताना संबंधितांची लेखी संमती घ्यावी व तालुकास्तरीय स्पर्धेदरम्यान आयोजकांकडे सादर करण्यात यावी.
- दोन्ही स्पर्धेत किमान एक शिक्षकाने सहभाग घ्यावा याकरिता शिक्षकांना प्रोत्साहित करावे.

- दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पर्यंत केंद्रप्रमुख यांनी या स्पर्धेकरिता शिक्षकांच्या नामनिर्देशनाची प्रक्रिया पूर्ण करावी.
- तालुकास्तरावर/शहर साधन केंद्रावर प्रत्येक स्पर्धेकरिता निवडण्यात आलेले प्रथम क्रमांक हे विभाग स्तरावरील स्पर्धेकरिता पाठविण्यात यावेत .
- तालुकास्तरीय /शहर साधन केंद्रस्तरावर स्पर्धेकरिता सदर भाषेत तज्ञ व सक्षम परीक्षकांची निवड करण्यात यावी तसेच परीक्षकांची नावे अंतिम करून दि.३१/१०/२०२५ पर्यंत परीक्षकांच्या अर्हतेबाबत योग्य त्या माहितीसह जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याकडे पाठविण्यात यावी.
- सदर स्पर्धेचे योग्य ते सनियंत्रण होणेकरिता पर्यवेक्षकांची निवड करावी. व त्यांची देखील माहिती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेस पाठविण्यात यावी.
- प्रत्येक स्पर्धेकरिता भाषानिहाय तीन परीक्षकांची निवड करण्यात यावी.परीक्षाकांकरिता आवश्यक मानधन विहित निकषानुसार निधी प्राप्त झाल्यानंतर देण्यात यावे.
- स्पर्धेचे ठिकाण शिक्षकांना व्यवस्थित परीक्षा देता यावी या करिता योग्य त्या सोई-सुविधा असावे.
- सदर स्पर्धेची तयारी करण्याकरिता शिक्षकांना कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी .
- तालुकास्तरीय/शहर साधन केंद्रस्तरावर परकीय भाषा स्पर्धेबाबतचे स्वरूप खालील प्रमाणे —(टीप — परिषदेच्या परकीय भाषा स्पर्धा या बाबत संकेतस्थळावर शिक्षक मार्गदर्शिकेतील नमूद करण्यात आलेल्या स्पर्धेच्या स्वरुपात खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.कृपया याची दखल घ्यावी.)
- **परकीय भाषा स्पर्धेचे स्वरूप :**
- परकीय भाषा स्पर्धा याकरिता जर्मन व फ्रेंच या केवळ दोनच भाषांचा विचार करण्यात यावा.

| अ.क्र. | स्पर्धेचे स्वरूप | गुणदान |
|---|---|---|
| १. | परकीय भाषा स्पर्धा -<br>शिक्षकांना ३० शब्दांचे शब्दलेखन (जर्मन/फ्रेंच भाषा) | १ शब्दाकरिता १ गुण या प्रमाणे ३० शब्दाकरिता ३० गुण देण्यात यावे. |

- सदर स्पर्धेकरिता या स्पर्धेत भाग घेतलेल्या शिक्षकांकरिता लेखनाकरिता जर्मन व फ्रेंच या भाषेतील आवश्यक शब्दसंग्रह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.सदर शब्दसंग्रह जिल्ह्यातील सर्व सहभागी शिक्षकांना आपल्या स्तरावरून उपलब्ध करून देण्यात यावा .
- शिक्षकांची शब्दसंग्रहावर आधारित स्पर्धा घेण्यात यावी.
- सदर स्पर्धेचा कालावधी एकूण ४५ मिनिटांचा असेल .
- सदर स्पर्धा नेमून दिलेल्या दिवशी ठीक ११:०० वाजता सुरु करण्यात यावी.
- परकीय भाषा स्पर्धेकरिता राज्यस्तरावरून सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य व शिक्षक स्पर्धा यासाठी नियुक्त करण्यात आलेले नोडल अधिकारी यांच्याकरिता व्हाटस ॲप द्वारे गटाची निर्मिती करण्यात येईल .
- शिक्षकांची परकीय भाषा स्पर्धा घेताना राज्यस्तरावरून प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल .सदर प्रश्नपत्रिका ही स्पर्धेच्या दिवशी स्पर्धा सुरु होण्यापूर्वी काही वेळापूर्वी व्हाटस ॲप वरील गटावर उपलब्ध करून देण्यात येईल.
- सदर स्पर्धेचे सनियंत्रण पर्यवेक्षकाद्वारे करण्यात यावे.
- परकीय भाषा स्पर्धेकरिता प्रश्नपत्रिकेत मराठी भाषेतील शब्द दिले जातील .प्रश्नपत्रिकेत दिलेले शब्द आपल्या स्तरावरून फलकावर लिहून देण्यात यावेत.

- फलकावर लिहून दिलेले शब्द शिक्षकांनी स्पर्धेत सहभागी होणेकरिता ज्या भाषेकरिता नामनिर्देशन करण्यात आलेले आहे त्या भाषेत उत्तरपत्रिकेत लिहावयाचे आहेत. उदा.झाड हा शब्द मराठी भाषेत फलकावर लिहून देण्यात आलेला असेल तर शिक्षकांनी जर्मन भाषेकरिता सहभाग नोंदविला असल्यास सदर शब्द जर्मन भाषेत लिहावयाचा आहे व जर शिक्षकांनी फ्रेंच भाषेकरिता सहभाग नोंदविला असल्यास सदर शब्द फ्रेंच भाषेत लिहावयाचा आहे.
- स्पर्धेत भाग घेतलेल्या शिक्षकांना दिलेले शब्द लिहिण्याकरिता उत्तरपत्रिका उपलब्ध करून देण्यात यावी.शिक्षकांनी सदर उत्तर उत्तरपत्रिकेत लिहावयाचे आहेत.
- शिक्षकांच्या उत्तरपत्रिकेचे संकलन करताना शिक्षकांनी आपले नाव उत्तरपत्रिकेवर लिहून स्वाक्षरी केले असल्याची खात्री करावी.
- शिक्षकांची परकीय भाषा स्पर्धा घेऊन झाल्यावर राज्यस्तरावरून आदर्श उत्तरपत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल.
- आपल्या स्तरावरून आदर्श उत्तरपत्रिकेच्या आधारे शिक्षकांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी त्याच दिवशी करण्यात यावी.
- परीक्षकांनी तपासणी केल्यानंतर स्पर्धेचा निकाल तयार करण्यात यावा.व स्पर्धेकरिता विजेत्याची निवड करण्यात यावी.व त्याच दिवशी हा निकाल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,विभागीय स्तरासाठी निश्चीत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व आयोजक जिल्ह्याच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना इ .मेल वर पाठवावा.
- तालुकास्तरीत स्पर्धेतून/शहर साधन केंद्रस्तरावरून प्रत्येक भाषेकरिता एक शिक्षक याप्रमाणे शिक्षकांची निवड करावी व त्यांचे विभागस्तरीय स्पर्धेकरिता नामनिर्देशित करावे.
- तालुकास्तरीय / शहर साधन केंद्रस्तरावरून वरील स्पर्धेची जबाबदारी ही तालुकास्तरीय / शहर साधन केंद्रस्तरावर नेमण्यात आलेल्या समितीची राहील .
- वर नमूद केलेप्रमाणे आपल्या स्तरावरून त्वरित बैठकांचे आयोजन करून सदर स्पर्धेविषयी माहिती देण्यात यावी.तालुकास्तरीय/शहर साधन केंद्रस्तरावर स्पर्धा या गटशिक्षणाधिकारी/सहायक प्रशासकीय अधिकारी यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे यांनी दिलेल्या नियोजनाप्रमाणे करण्यात यावे.
- **तालुकास्तरीय स्पर्धेचे नियोजन-**

| अ क्र | स्पर्धेचे आयोजन | स्पर्धेचे नाव | तालुकास्तर कामकाज पूर्तता |
|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर महिन्यातील चौथा शनिवार | परकीय भाषा स्पर्धा | संदर्भ क्र.१ नुसार नोव्हेंबर अखेरपर्यत त्यातील कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज - (प्रत्येक स्पर्धेतील प्रत्येक भाषेतील विजेता निवडणे) |

- परकीय भाषा स्पर्धेचे विभागस्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धेबाबतच्या मार्गदर्शक सूचना नंतर निर्गमित करण्यात येतील.
- वरील नियोजनात काही कारणास्तव बदल झाल्यास आपणास कळविण्यात येईल.

**(नामदेव शेंडकर)**
**प्राचार्य,**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
भवानी पेठ, पुणे.